Teachingninja.in

Latest Govt Job updates

Private Job updates

Free Mock tests available

Visit - teachingninja.in

# MAH B.Ed CET

## Previous Year Paper

## 10 Jun, 2013

Teachingninja.in

# बी. एड. सीईटी प्रवेशपूर्व परीक्षा

## पेपर १० जून-२०१३

वेळ-६० मिनीटे गुण-५०

1. खालील मालिका पूर्ण करा.
1215, 2430, 3645, 4860, ------------
A) 6861 B) 1860 C) 6075 D) 4960

2. पहिल्या दोन शब्दांत जो संबंध आहे तोच संबंध तिसऱ्या शब्दाच्या रिक्त जागेतील शब्दाशी आहे. रिक्त जागेतील शब्द कोणता?
मौन : बडबड : : स्वागत : ------------
A) समीक्षण B) निमंत्रण C) निरोप D) समारंभ

3. एका सांकेतिक भाषेत SENT हा शब्द + – × ÷ असा लिहिला तर त्याच भाषेत TEN हा शब्द कसा लिहाल?
A) ÷ – + B) ÷ – ÷ C) ÷ – × D) ÷ × –

4. प्रश्नचिन्हाच्या जागी अचूक अक्षर व अंक असलेला पर्याय कोणता?

| | | | | |
|---|---|---|---|---|
| A | F | K | P | ? |
| 5 | 11 | 17 | 23 | ? |

A) $\frac{S}{27}$ B) $\frac{T}{29}$ C) $\frac{W}{28}$ D) $\frac{U}{29}$

5. जर दोनला तीन, तीनला चार, चारला पाच आणि पाचला दोन म्हटले तर त्यानुसार तीन अधिक पाच बरोबर किती?
A) सहा B) सात C) आठ D) नऊ

6. खालील आकृतीमधील आयतांची संख्या किती आहे?



A) 13 B) 14 C) 15 D) 16

7. एका गोल टेबलाभोवती सहा मुले बसली आहेत. मीना ही नलिनी व मोहनच्यामध्ये बसली आहे. संतोष हा रोहिणी व शरदच्यामध्ये बसला आहे. जर मोहन शरदजवळ बसला असेल तर नलिनीजवळ कोण बसले आहे?
A) रोहिणी B) मोहन C) संतोष D) शरद

8. अनिल एका ठिकाणाहून उत्तरेला दोन किलोमीटर चालत गेला. तेथून उजवीकडे वळून 1.5 किलोमीटर अंतर त्याने धावत काटले. पुढे पुन्हा उजवीकडे वळून 2 किलोमीटर अंतर त्याने सायकलवरून पार केले तर आता तो मूळ ठिकाणाच्या कोणत्या दिशेला आहे?
A) पूर्व B) पश्चिम C) उत्तर D) दक्षिण



Teachingninja.in

9. सुधीर हा कुमारचा एकुलता एक मुलगा आहे. राणी रजनीची मुलगी आहे. कुमार रजनीचे सासरे आहेत तर सुधीरचे राणीशी नाते काय?


A) भाऊ B) वडील C) मुलगा D) काका

10. (I) आणि (II) या एकाच सोंगटीच्या दोन स्थिती आहेत. जर आणखी एका स्थितीत 6 हा अंक सोंगटीच्या वरच्या पृष्ठावर असेल तर खालच्या पृष्ठावर कोणता अंक असेल?




A) 2 B) 5 C) 4 D) 3

11. कोणती आकृती इतर आकृत्यांपेक्षा वेगळी आहे?



A B C D

A) A B) B C) C D) D

12. जर शिक्षकदिन गुरूवारला येत असेल तर त्याचवर्षी महात्मा गांधी जयंती कोणत्या वारी येईल?

A) मंगळवार B) बुधवार C) गुरूवार D) शुक्रवार


13. माझ्या घड्याळात आता नऊ वाजले आहेत. तास काटा पश्चिम दिशा दाखवतो आहे, तर मिनिट काट्याच्या विरूध्द दिशा कोणती?

A) वायव्य B) उत्तर C) दक्षिण D) आग्नेय

14. कपाटातील कप्प्यात गणिताच्या पुस्तकाचा डावीकडून 15 वा तर उजवीकडून 17 वा क्रमांक आहे, तर या कपाटातील कप्प्यात एकूण किती पुस्तक आहेत?

A) 32 B) 31 C) 30 D) 29

15. खालील आकृतीचे जल प्रतिबिंब कसे दिसेल?



A) A B) B C) C D) D

16. मूल -------- शिकते.

A) पुस्तकाच्या साहाय्याने B) संवेदनांव्दारे C) चित्राच्या मदतीने D) मित्रांसोबत

17. शिक्षकाचे संप्रेषण प्रभावी म्हणता येऊ शकते जेव्हा --------

A) शिक्षकाने सांगितलेले सर्व विद्यार्थी पुन्हा सांगू शकतात.

B) विद्यार्थी अध्यापनाची तपशीलवार टिपणे घेतात.

C) विद्यार्थ्यांना शिकवलेल्या आशयाचे आकलन होते.

D) विद्यार्थी वर्गात लक्ष देतात.

18. मूलतः अध्ययन -------- आहे.

A) अध्ययनासाठी B) अस्तित्वासाठी C) ज्ञानासाठी D) कृतीसाठी



Teachingninja.in

19. पुढीलपैकी कोणत्या शिक्षकाला शिस्तीचा खरा अर्थ माहीत आहे?
A) जो विद्यार्थ्यांना मुळीच शिक्षा करत नाही
B) जो वर्गात संपूर्ण शांतता राखतो
C) जो विद्यार्थ्यांना सर्व नियम पाळण्याचे प्रशिक्षण देतो
D) जो विद्यार्थ्यांना स्वयंशिस्त राखण्यास प्रेरित करतो

20. शिक्षणातील लोकशाही म्हणजे ---------
A) सर्व विद्यार्थ्यांना संधी
B) बहुतांश विद्यार्थ्यांना संधी
C) निवडून आलेल्या विद्यार्थ्यांना संधी
D) प्रतिभावंत विद्यार्थ्यांना संधी

21. आधुनिकीकरणाचा विचार केला तर अध्यापनात सगळ्यांत महत्त्वपूर्ण बाब कोणती ?
A) इंटरनेटचा उपयोग
B) शिक्षकाचा जागतिक दृष्टीकोण
C) शिक्षकाची तळमळ
D) शिक्षकाचे संशोधन

22. आदिवासी भागातील विद्यार्थी वंचित म्हटले जातात. खालीलपैकी कोणते कारण योग्य नाही?
A) त्यांची आर्थिक स्थिती गरीब असते.
B) त्यांची संस्कृती भिन्न असते.
C) त्यांची बौध्दिक पातळी कमी असते.
D) त्यांची भाषा प्रमाण-भाषेपेक्षा भिन्न असते.

23. पुढीलपैकी कोणते विधान चुकीचे आहे?
A) मूकाभिनयात संवाद नसतो.
B) मूकाभिनयात संवाद असतो.
C) मूकाभिनयात नाट्य असते.
D) मूकाभिनयात हावभाव असतात.

24. कोणता समाज महत्त्वाचा ?
A) मूल्याधारित समाज
B) आर्थिकदृष्ट्या समृद्ध समाज
C) वैज्ञानिक प्रगती केलेला समाज
D) जागतिक समाज

25. जर एखादा शिक्षक त्याच्या विषयाचा संपूर्ण पाठ्यक्रम विद्यार्थ्यांना स्वयंअध्ययनासाठी सोडून देत असेल तर त्याच्या ह्या कृतीचा प्रकार कोणता ?
A) विद्यार्थिकेंद्री
B) शिक्षककेंद्री
C) विषयकेंद्री
D) अशैक्षणिक

26. जीवनाशी संबंध जोडून शिकविल्यास -
A) विद्यार्थी कंटाळून जातात.
B) त्याचा परीक्षेत काही फायदा होत नाही.
C) अध्यापन प्रभावहीन होते.
D) विद्यार्थ्यांना आशय चांगला समजतो.

27. कार्यकाळ संपल्यानंतर कोणाला माजी संबोधले जात नाही ?
A) मंत्री
B) शिक्षक
C) जिल्हाधिकारी
D) अधिष्ठाता

28. एका विद्यार्थ्याला तुम्ही खडूवर मजेदार चेहरे कोरताना पकडले. तुम्ही -
A) वर्गात लक्ष न देण्याबद्दल त्याला रागावाल
B) शाळेत खोड्या करणे टाळण्याबद्दल त्याचे मन वळवाल.
C) कलाशिक्षकाशी संपर्क साधून त्याला कोरीवकामाच्या कलेबाबत मार्गदर्शन करायला सांगाल.
D) त्याची स्तुती कराल व पुन्हा असे न करण्याबाबत त्याला बजावाल.

29. प्रभावी अध्यापनासाठी पुढील कृतींची क्रमबद्ध मांडणी करा.
i) अध्यापन करणे ii) नियोजन करणे iii) चर्चा करणे iv) मूल्यमापन करणे
A) ii, i, iii, iv
B) i, ii, iii, iv
C) iii, i, ii, iv
D) ii, iii, i, iv



Teachingninja.in

30. तुमच्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्याला न्यूटनचा गतिविषयक पहिला सिद्धांत समजलेला नाही, तुम्ही काय कराल ?

A) त्याला ग्रामीण भागातील भाषेत समजावून सांगेन.

B) त्याला त्या सिद्धांताशी संबंधित कृती करायला सांगेन

C) त्याला पुस्तकातून वाचायला सांगेन.

D) त्याला त्या सिद्धांताशी संबंधित गृहपाठ देईन.

31. पदार्थाच्या तीन अवस्था विज्ञानाच्या पाठ्यपुस्तकात नमूद केलेल्या आहेत. शास्त्रज्ञांनी पदार्थाच्या एकूण पाच अवस्थांचा शोध लावलेला आहे. पदार्थाच्या अवस्था शिकविताना तुम्ही काय कराल ?

A) विद्यार्थ्यांना पदार्थाच्या पुस्तकातील तीनच अवस्था सांगेन.

B) विद्यार्थ्यांना पदार्थाच्या पाच अवस्था सांगेन; पण परीक्षेत पुस्तकातल्या तीन अवस्था लिहायला सांगेन.

C) विद्यार्थ्यांना पदार्थाच्या पाच अवस्था सांगेन आणि परीक्षेत पाच अवस्था लिहायला सांगेन.

D) पाठ्यक्रम बदलेपर्यंत शोध लावू नका, असे शास्त्रज्ञांना कळविल.

32. शिक्षक देशाचे नेते आहेत; कारण

A) ते देशाच्या निवडणूक प्रक्रियेत सहभागी होतात. B) ते भावी नागरिकांचे जीवन घडवितात.
C) ते भावी पिढीवर नियंत्रण ठेवतात. D) ते उच्च विभूषित असतात.

33. माझी नियुक्ती मूल्यशिक्षणासाठी नाही, असे विधान इतिहासाच्या शिक्षकाने केले आहे. हे विधान-

A) पूर्णपणे चुकीचे आहे. B)पूर्णपणे बरोबर आहे. C)अंशतः चुकीचे आहे. D)वैयक्तिक आहे.

34. एखादा संदेश सर्वांपर्यंत पोहोचविण्यासाठी योग्य माध्यम कोणते ?

A) संकेत B) कथन C) लेखन D) भाषांतर

35. मूल्यमापनात प्रकल्प व प्रासंगिक निरीक्षणाचा समावेश करण्याचा प्रमुख हेतू म्हणजे -

A) विद्यार्थ्यांवरील अभ्यासाचा ताण कमी करणे.

B) सातत्यपूर्ण व सर्वंकष मूल्यमापन करणे.

C) विद्यार्थ्यांना किमान आवश्यक गुण मिळविण्यात मदत करणे.

D) विद्यार्थ्यांना वर्षभर गुंतवून ठेवणे.

36. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार राबविण्यात आलेल्या खडू-फळा मोहिमेचा संबंध खालीलपैकी कोणत्या विधानाशी आहे ?

A) ग्रामीण शिक्षणाचा दर्जा सुधारणे. B) आदिवासींच्या शिक्षणाचा दर्जा सुधारणे.
C) झोपडपट्टीतील मुलांच्या शिक्षणांचा दर्जा सुधारणे D) प्राथमिक शिक्षणाचा दर्जा सुधारणे.

37. खालीलपैकी कोणता ग्रंथ संत ज्ञानेश्वरांनी लिहिलेला नाही ?

A) ज्ञानेश्वरी B) चांगदेवपासष्टी C) अमृतानुभव D) रुक्मिणी स्वयंवर

38. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष व सदस्यांची नेमणूक कोण करतात ?

A) भारताचे राष्ट्रपती B) महाराष्ट्राचे मुख्यमंत्री C) महाराष्ट्राचे राज्यपाल D)भारताचे पंतप्रधान

39. भारतातील कोणत्या राज्यास दोन राजधान्या आहेत ?

A) महाराष्ट्र B) जम्मू-काश्मीर C) पंजाब D) केरळ



Teachingninja.in

40. कोणत्या खंडाच्या मध्यातून विषुववृत्त गेलेले आहे ?
A) युरोप B) अमेरिका C) आफ्रिका D) आशिया

41. दिल्लीच्या गादीवर बसणारी पहिली महिला कोण होती ?
A) नूरजहाँ B) चाँदबिबी C) मुमताज D) रजिया सुलताना

42. http://www.examination.com हे उदाहरण ............ चे आहे.
A) URL B) HTML C) XML D) LAN

43. विद्युत प्रवाह मोजण्याचे परिमाण ............... आहे.
A) ज्यूल B) ॲम्पियर C) न्यूटन D) डेसिबल्स

44. महाराष्ट्रात सामाजिक वनीकरण ............... साली सुरू झाले.
A) इ.स. 1981 B) इ.स. 1982 C) इ.स. 1983 D) इ.स. 1984

45. साठाव्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारातील सर्वोत्तम मराठी चित्रपटाचा मान .... या चित्रपटास जाहीर केला गेला.
A) देऊळ B) धग C) इनव्हेस्टमेंट D) बालक-पालक

46. खालीलपैकी कोणत्या राज्यात दर हजारी पुरुषांपेक्षा स्त्रियांचे प्रमाण अधिक आहे ?
A) तामिळनाडू B) केरळ C) कर्नाटक D) आंध्र प्रदेश

47. डेव्हिड बेकहॅम कोणत्या खेळाशी-संबंधित आहे ?
A) क्रिकेट B) फुटबॉल C) हॉकी D) टेनिस

48. मराठेशाहीचा अस्त कोणत्या साली झाला ?
A) इ.स. 1947 B) इ.स. 1818 C) इ.स. 1857 D) इ.स. 1920

49. स्वमग्नता या मनोविकृतीवर आधारित चित्रपट कोणता ?
A) तारे जमिं पर B) बर्फी C) सदमा D) कोशिश

50. पृथ्वीचे वय ............. द्वारे निश्चित केले जाते.
A) युरेनिअम मापन B) कार्बन मापन C) अणू कालमापन D) जैव कालमापन

## उत्तर सूची

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१-C | ०२-C | ०३-C | ०४-D | ०५-A | ०६-A | ०७-A |
| ०८-C | ०९-B | १०-B | ११-B | १२-B | १३-C | १४-B |
| १५-C | १६-B | १७-C | १८-C | १९-D | २०-A | २१-B |
| २२-C | २३-B | २४-A | २५-D | २६-D | २७-B | २८-C |
| २९-A | ३०-B | ३१-B | ३२-B | ३३-A | ३४-C | ३५-B |
| ३६-D | ३७-D | ३८-C | ३९-B | ४०-C | ४१-D | ४२-A |
| ४३-B | ४४- | ४५-B | ४६-B | ४७-B | ४८-B | ४९-A |
| ५०-A | | | | | | |



Teachingninja.in